**<u>दि. १ जानेवारी २०१५ ते दि. ३१ मार्च २०१५ या कालावधीसाठी संग्राम प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाऑनलाईनकडून देण्यात येणाऱ्या सेवांचा मोबदला अदा करण्याची कार्यपध्दती</u>**

## महाराष्ट्र शासन
### ग्राम विकास विभाग
### शासन परिपत्रक क्रमांकः संग्राम-२०११/प्र.क्र.६/पंरा-३ (संग्राम कक्ष)

बांधकाम भवन, मर्झबान पथ,
मंत्रालय, मुंबई -४०० ००१
तारीख: २६ फेब्रुवारी, २०१५

**<u>वाचा</u>**

१) शासन निर्णय क्र.व्हीपीएम-२०११/प्र.क्र.६/पं.रा.-३ दि. २६ एप्रिल, २०११
२) शासन परिपत्रक क्र.तेविआ २०११/प्र.क्र.४२/वित्त-४ दि. ३० एप्रिल, २०११
३) शासन निर्णय क्र.व्हीपीएम-२०११/प्र.क्र.६/पं.रा.-३ दि. ३० एप्रिल, २०११
४) शासन परिपत्रक क्र.तेविआ-२०११/प्र.क्र.४२/वित्त-४ दि. १ नोव्हेंबर, २०११
५) शासन निर्णय क्र.मातंस,/२०१२प्र.क्र.१५२/३९ दि. २३ मे, २०१२
६) शासन निर्णय क्र. संग्राम-२०१२/प्र.क्र.१४७/संग्राम कक्ष दि. १६ जानेवारी, २०१३
७) शासन निर्णय क्र. संग्राम-२०१३/प्र.क्र.५०/संग्राम कक्ष दि. ३० मार्च, २०१३
८) शासन निर्णय क्र. संग्राम-२०१३/प्र.क्र.२९/संग्राम कक्ष दि. १ नोव्हेंबर, २०१३
९) शासन निर्णय क्र. संग्राम-२०१३/प्र.क्र.९१/संग्राम कक्ष दि. ५ फेब्रुवारी, २०१४
१०) शासन निर्णय क्र. संग्राम-२०११/प्र.क्र.६/पंरा-३ (संग्राम कक्ष) दि. २७ मे, २०१४
११) शासन निर्णय क्र. संग्राम- २०१४/प्र.क्र.१२७/संग्राम कक्ष दि. २० ऑगस्ट २०१४

**<u>प्रस्तावना</u>**

पंचायती राज संस्थांचे बळकटीकरण करुन त्यांचे कारभारात सुसूत्रता व पारदर्शकता आणण्याच्या हेतूने केंद्र शासनाचे पंचायती राज मंत्रालय ई-पंचायत हा Mission Mode Project सर्व राज्यांमध्ये राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात हा प्रकल्प संग्राम (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) या नावाने

राबविण्यात येत आहे. महाऑनलाईन (महाराष्ट्र शासन व टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस यांची सहभागीदारी कंपनी) ही या प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कार्यरत आहे. उपरोल्लेखित दि. २६ एप्रिल २०११, दि. ३० एप्रिल २०११ व दि. २७ मे २०१४ या शासन निर्णयाद्वारे महाऑनलाईनने या प्रकल्पांतर्गत पंचायती राज संस्थांना दयावयाच्या सेवा व महाऑनलाईनला त्यापोटी अदा करावयाचा मोबदला याबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. ई-पंचायत या प्रकल्पासाठी केंद्रशासनाने वेगळया निधीची तरतूद केली नसल्याने या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तेराव्या वित्त आयोगाचा निधी वापरण्याच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने दिल्या होत्या. तेराव्या वित्त आयोगाचा कालावधी दि. ३१ मार्च २०१५ पर्यंत आहे. तसेच या प्रकल्पाची अंमलबजावणी दि. १ मे २०११ पासून सुरू करण्यात आली. प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान कालानुरूप प्राप्त होणाऱ्या आज्ञावली, त्यानुसार करण्यात आलेले काम तसेच विविध सेवा, प्रशिक्षण, व उद्दीष्टनिहाय डेटा एन्ट्री या सर्व बाबींचा आढावा घेण्यात आला. अंमलबजावणीमध्ये कालानुरूप झालेले बदल व १३ व्या वित्त आयोगाचा संपणारा कालावधी लक्षात घेता दि. १ जानेवारी २०१५ ते दि. ३१ मार्च २०१५ या कालावधीत महाऑनलाईनला अदा करावयाचा मोबदला यामध्ये काही बदल तातडीने करण्याची निकड भासल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १५३ क (पंचायतींना अनुदेश आणि निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार) व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २६१ (१) (राष्ट्रीय व राज्य विकास योजनांच्या हिताच्या दृष्टीने निदेश देण्याचे राज्य शासनाचे अधिकार) यानुसार राज्य शासनास मिळालेल्या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना ई-पीआरआय (e-PRI) अंतर्गत महाऑनलाईनचे देयक अदायगीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देत आहेत.

## शासन परिपत्रक

**१३** व्या वित्त आयोगाचा कालावधी असेपर्यंत महाऑनलाईनला ग्रामपंचायत पातळीवर मोबदला अदा करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना या परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत.

ग्रामपंचायत पातळीवर महाऑनलाईनला संग्राम प्रकल्पाची अंमलबजावणी व अनुषंगिक सेवा यासाठी दरमहा रू. ८०००/- + सेवा कर इतकी ग्रामपंचायतीच्या हिस्स्यातील रक्कम जिल्हा परिषद स्तरावर राखून ठेवण्यात आलेली आहे. या रकमेचा दि.१ जानेवारी २०१५ ते दि.३१ मार्च २०१५ या कालावधीकरीता पुढीलप्रमाणे विनियोग करावा,

१. **VLE च्या मोबदल्यासाठी –**

१.१VLE च्या मोबदल्यासाठी महाऑनलाईनला **रू.४५००/- + सेवा कर** अनुज्ञेय राहील. ज्या ग्रामपंचायतीत डेटा एन्ट्री व ग्रामस्थांना दाखले देण्यासाठी महाऑनलाईनने प्रत्यक्ष संगणक परिचालक (VLE - **ग्रामपातळीवरील उदयोजक**) उपलब्ध करून दिलेला आहे व अशा VLE ने डेटा एन्ट्रीचे उद्दीष्ट (दि.२८ जून २०१४ रोजीच्या बैठकीत मा. प्रधानसचिव (ग्रामविकास) यांनी निश्चित केल्याप्रमाणे दरमहा प्रती ग्रामपंचायत उद्दीष्ट) १००% व त्यापेक्षा जास्त पूर्ण केले आहे, अशा VLE ना महाऑनलाईनमार्फत **रू.४५००/-** अदा करण्यात यावे.

१.२ज्या ग्रामपंचायतीत १००% पेक्षा कमी काम झाले आहे त्या ग्रामपंचायतींनी उद्दीष्टांच्या प्रमाणात महाऑनलाईनला VLE च्या मोबदल्यासाठी रक्कम अदा करावी. **ज्या VLE नी १००% पेक्षा कमी उद्दीष्ट पूर्ण केले आहे त्यांना त्यांनी केलेल्या डेटा एन्ट्री व सेवा यांच्या प्रमाणात महाऑनलाईनने मोबदला अदा करावा.**

१.३ज्या ग्रामपंचायतीमध्ये ४५० एन्ट्रीपेक्षा कमी रेकॉर्ड उपलब्ध आहे, अशा ग्रामपंचायतींच्या संबंधित ग्रामसेवकाने १००% काम पूर्ण झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच महाऑनलाईनला संबंधित VLE च्या मोबदल्यासाठी रक्कम अदा करावी.

**२. महाऑनलाईनचे सेवा शुल्क -**

२.१महाऑनलाईनला तांत्रिक सहाय्य व तंत्रज्ञान व्यवस्थापन तसेच VLE व्यवस्थापन (**दि.२७ मे २०१४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या ग्रामपंचायत पातळीवरील कागद, टोनर इ. स्टेशनरीचा खर्च वगळून** इतर सर्व कामांकरीता) इ. करीता प्रती ग्रामपंचायत **रू.२२००/- + सेवा कर** इतके सेवा शुल्क दयावे. सदर सेवा शुल्क अदा करताना ज्या ग्रामपंचायतींना महाऑनलाईनने प्रत्यक्ष VLE सह सेवा दिली आहे, अशाच ग्रामपंचायतींसाठी महाऑनलाईनचे देयक अदा करण्यात यावे. याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधीत ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांची राहील.

**२.२महाऑनलाईनने ज्या ग्रामपंचायतीत VLE उपलब्ध करून दिला आहे, अशाच ग्रामपंचायतींकडून महाऑनलाईनला, VLE व महाऑनलाईनचे सेवा शुल्क अदा करावे.**

**३ राखीव निधी** -

३.१उर्वरीत **रू.१३००/-** रक्कम संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे राखीव निधीच्या वापरासाठी ठेवावी.

**४ कागद, टोनर इ. स्टेशनरीचा खर्च** -

४.१आवश्यकतेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना उपरोक्त राखीव निधीतून काही रक्कम संबंधित ग्रामपंचायतीला स्टेशनरी व टोनरच्या खर्चासाठी देता येईल. संबंधित ग्रामपंचायतीला दरमहा रू.५००/- पर्यंतच्या खर्चाच्या मर्यादेत स्टेशनरी खरेदी करण्याची मुभा राहील.

**५ दि. १ जानेवारी २०१५ पूर्वीची देयक अदायगी -**

५.१दि. १ जानेवारी २०१५ पूर्वीची देयक अदायगी ही दि.२६ एप्रिल २०११, दि.२७ मे २०१४ व देयक अदायगी बाबतची परिपत्रके यामध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

## ६ संक्रमण कालावधी

**६.१**सदर व्यवस्था दि.१ जानेवारी २०१५ ते दि.३१ मार्च २०१५ या कालावधीकरीताच मर्यादीत राहील. पुढील कालावधीत निधीची उपलब्धता व अंमलबजावणीबाबतचे धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

हे शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून याचा संगणक संकेतांक २०१५०२२६१८०४४२९८२० असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.02.26 19:23:52 +05'30'

**वि. गिरिराज**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय
३. मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
४. मा.उपमुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
५. शासनाचे मुख्य सचिव
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व सहसचिव/उपसचिव (ग्रामविकास विभाग)
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१०.सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
११.अतिरिक्त संचालक, एसआयआरडी, यशदा, पुणे.
१२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१३.सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत/सा.प्र.वि)

१४.प्राचार्य, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र (सर्व)
१५.सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
१६.मुख्य परिचालन अधिकारी, महाऑनलाईन
१७.मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
१९.निवड नस्ती, संग्राम कक्ष, ग्रामविकास व पंचायत राज विभाग